IMPACT FACTOR 6.10
ISSN 2393-8412
Indo Asian Social Science Research Journal (IASSRJ)
Issue : XIV, Vol. I
Feb. 2021 To July 2021
www.irasg.com

Research Paper 17 Sociology

# बीड जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यावरील शासकीय योजनेच्या अभ्यासाचे समाजशास्त्रीय महत्व

डॉ. यादव घोडके
समाजशास्त्र विभाग,
वसंतदादा पाटील महाविद्यालय,
पाटोदा, जि. बीड

**प्रस्तावना :**

बीड जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यावरील शासकीय योजनेच्या प्रभावाचा समाजशास्त्रीय अभ्यास करणे अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. अशा प्रकारचा अभ्यास यापूर्वी कोणीही केलेला नाही किंवा यापूर्वी या विषयाचा अभ्यास कोठेही झालेला नाही. काही त्रोटक लेख वजा करता काही लिखाण झालेले असले तरी सातत्याने या विषयाचा अभ्यास झालेला नाही.

अल्पभूधारक शेतकऱ्यास शेतीमशागत करतांना नांगरणी, पेरणी, कोळपणी, निंदणी, काढणी आणि मळणी, ही सर्व कामे प्राधान्याने ते करीत असले तरी ही कामे अंग मेहनतीची व स्वतःच्या आर्थिक प्रेरणा असलेली आहे. त्यामुळे या शेतकरी वर्गाचे या अभ्यास विष्यात मोलिक स्वरूपाचे स्थान आहे. शेतकरी वर्ग संघटीत नसल्यामुळे आपल्या व्यवसायातील अल्पशः उत्पन्नावर त्यास समाधान मानावे लागत असे, अशा शेतकऱ्यांना शेतात श्रम जास्तीचे करावे लागत होते. खर्च जास्त होत असे आणि तुलनेत उत्पन्न कमी मिळत असे. त्यांना त्यांच्या श्रमाचे मूल्यकाटेकोर पणे मिळेलच असे नाही. अल्पभूधाक शेतकरी शेतीलगत व्यवसाय म्हणून पशुचे पालन करणे, दुग्ध व्यवसाय, कुकुटपालन, करणे, शेळीमेंढीचे पालन आणि बैल जोडीसह इतरांच्या शेतामध्ये मजुरी करणे किंवा रेजेगार हमी योजनेवर मजुरीसाठी पिण्याच्या पाण्यासाठी बैलगाडी मजुरीने लावणे ही कामे काही शेतकरीपुरक व्यवसाय करतात. पुरक व्यवसायासाठी शासनाच्या विविध येजना असून याचा फायदा शेतकरी घेतात का? कोणकोणत्या योजना शेतकऱ्यासाठी राबवल्या जातात याचा अभ्यास करणे येथे महत्त्वाचे आहे.

ग्रामीण भागामध्ये अल्पभूधाक शेतकऱ्यास शेतीमध्ये नियमित स्वरूपात रोजगार उपलब्ध हेत नाही. शेती व्यवसायात पेरणी ते कापणीपर्यंत रोजगार दुर्मिळ होतो. अशा वेळेस ग्रामीण भागात बसून खाणे परवडत नाही. कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडणे अशक्य होते. हे शेतकरी शेतीलगत जोडधंदे

करतात. अशा शेतकऱ्यांना शासनाच्या विविध योजनेचा फायदा होतो किंवा नाही याबाबत अभ्यास करणे आवश्यक आहे. आर्थिक हलाखीला तोंड द्यावे लागते म्हणून अल्पभूधारक शेतकऱ्यांना आर्थिक परिस्थितीत बद्ध होऊन आपल्या आर्थिक स्थितीत बदल व्हावा यासाठी ऊसतोडणी काम स्विकारावे लागते. हे काम हंगामी स्वरूपाचे असले तरी शेतीचा हंगाम येण्यापूर्वी काही काळ हे काम करणे अल्पभूधारक शेतकऱ्यास परवडते. एकदा पीक येण्याच्या आधी आपल्या गरजांच्यापूर्तीसाठी हे काम त्याला स्विकारावेच लागते. काही अल्पभूधारक शेतकरी ऊसतोडणीस गेल्यानंतर साखर कारखान्याच्या परिसरात दूध व्यवसाय, किराणा दुकान, चहाची दुकान आणि वडे विकणे असे विविध व्यवसाय करून जास्तीचे पैसे कमावतात व आपल्या कुटुंबाचा चरितार्थ व्यवस्थीत चालवतात. म्हणून त्यांचा अभ्यास होणे आवश्यक ठरते. अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या कमाचे स्वरूप कौटुंबिक कष्टावर अवलंबून आहे. या कष्टामुळेच त्यांना पैसा मिळतो. हा पैसा आपल्या कौटुंबिक चरितार्थासाठी खर्च करतात. कौटुंबिक जीवनातील काही महत्त्वाच्या जबाबदाऱ्याही त्यांनी पार पाडलेल्या असतात. मुला-मुलींचे विवाह कार्ये, शिक्षण, घरबांधणी आणि शेतीसाठी बैल व अवजारे खरेदी अशा काही जीवनातील महत्त्वाच्याबाबीही स्वतःच्या कष्टावर विश्वासून त्यो पार पाडलेल्या असतात. त्यामुळे आर्थिक प्रेरणा यांच्या मुळाशी आहे. शासकीय योजनेतून आर्थिक प्रेरणेचा अभ्यास हाच या प्रस्तुत प्रबंधाचा गाभा आहे.

अल्पभूधाक शेतकऱ्यावरील शासकीय योजनेच्या प्रभावाचा समाजशास्त्रीय अभ्यासाचे महत्त्व सर्वच शेतकऱ्यांच्या दृष्टीने आहे. शासकीय योजनेच्या फायद्यामुळे शेतकऱ्यांचा आर्थिक आणि सामाजिक सुधारणा होत असते. यामुळेच या विषयाचे महत्त्व पुढील प्रमाणे स्पष्ट करता येते.

१) बीड जिल्ह्यात शेतीच्या मशागतीसाठी व रोजगार हमीच्याकामासाठी मजुर उपलब्ध होत नाहीत. एकीकडे रस्तशक्ती घटल्यामुळे शेती व्यवसाया व इतर क्षेत्रात ही उत्पादकता घटते व त्याचा परिणाम सर्व जिल्ह्यातच जाणवतो. त्यामुळे अनेक प्रश्न निर्माण होतात. हे प्रश्न निर्माण होऊ नयेत म्हणून शासनाने अनेक योजना अल्पभूधारक व भूमिहीन शेतमजुरांसाठी निर्माण केलेल्याआहे. याचा फायदा घेतला जात नाही. त्याचाही विचार होणे गरजेचे आहे.

२) महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा शेती व्यवसाय हा कणा आहे. अल्पभूधारक शेतकरी हा शेती व्यवसायाच्या तळाशी आहे. अल्पभूधारक शेतकरी आणि शासनाच्या विविध योजना हा एक गूढ आणि महत्त्वाचा घटक आहे. त्यामुळे त्यांच्या आर्थिक स्थितीत होणारी परिवर्तने अभ्यासणे हा प्रस्तुत विषयाचा गाभा आहे.

बीड जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतकरी ऊसतोडणीसाठी पश्चिम महाराष्ट्रात स्थलांतर करतात त्यामुळे जिल्ह्यातील व्यापार, दुकानदार व इतर व्यवसायावर फार मोठा परिणाम झालेला दिसून येतो. या परिणामाचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

अल्पभूधारक शेतकरी हे भिन्न जात, धर्म, वंश, लिंग, पंथ, आणि सांस्कृतीक विविधता अशा बहुविध भिन्नतेचे असतात. त्यांच्या सर्वांगिण जीवनाला कलाटणी देणारी आर्थिक प्रणाली चिंतनाचा विषय झाली आहे. असंख्य समस्त्यांनी ग्रसत असलेला अल्पभूधाक शेतकरी हा शोषित घटक म्हणून तयांचेकडे पाहिले पाहिजे. मग हे शोषण अर्थापासून ते श्रमापर्यंत कोणत्याही प्रकारचे असा त्याचा अभ्यास होणे अत्यंत गरजेचे आहे. प्रामुख्याने स्वातंत्र्योत्तर कालखंडात हा

अल्पभूधाकर शेतकरी वर्ग सातत्यो वाढत गेला व त्याच्या कार्यपद्धतीमुळे तो शासनाच्या नजरेत भरला. शासनाने त्यांच्यासाठी अनेक योजना सुरू केल्या आहेत, म्हणूनच प्रस्तुत अभ्यासकाचे त्याकडे लक्ष वेधले गेले. त्यातूनच खरे अभ्यासाचे महत्तव वाढत गेले.

५) बीड जिल्ह्यतील अल्पभूधाक शेतकऱ्यांवरील शासकीय योजनेचा प्रभाव या विषयाचा आर्थिक परिवर्तनाचा अभ्यास करताना हा महत्त्वचा घटक ठरू लागला. एकीकडे सामान्य शेतमजुराला स्वतःच्या श्रमाचे भान आले आहे. हा अभ्यास जसा बीड जिल्ह्यासाठी महत्त्वाचा ठरतो तसाच तो इतर जिल्ह्यांना मार्गदर्शक ठरू शकेल असा विश्वास वाटतो.

६) शासनाच्या विविध योजनातून अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या सर्वांगीण अभ्याचे महत्तव आहे. पण आर्थिक बाबीकडे जास्त जक्ष वेधले आहे त्याचा राजकीय, सामाजिक, संस्कृतिक, भावनिक, शैक्षणिक आणि कौटुंबिक अशा सर्व घटकावर परिणाम हातो. हे परिणाम क्वचित दुरगामी स्वरूपाचे ही असतात म्हणून त्या परिणामाचा औयास करणे योग्य ठरते. तरी सर्वच बाबींचा परामर्श घेण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. त्यामुळे प्रस्तुत अभ्यास विषयास महत्तव प्राप्त झालेले आहे.

७) अल्पभूधेरक शेतकरी आणि शासकीय योजना हा विषय मळत्त्वाचा आहे. अल्पभूधाकर शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करण्यास यामुळे प्रामुख्याने नवीन आणि एक वेगळी दिशा मिळते. शेतकऱ्याच्या कार्य कुशलतेमुळेच शेतीचे उत्पादन वाढते. हा शेतकऱ्याचा आणि त्यांच्या कुटुंबाचा एक फार मोठा फायदा आहे. त्यामुळे या घटकाच्या अभ्यासाला प्राधानय द्याला हवे. या विषयावर या अगोदर कोणीही प्रयत्न केलेला नाही. म्हणून या विषाची आवश्यकता लक्षात घेऊन हा विषय अभ्यासासाठी निवडलेला आहे.

८) अल्पभूधाकर शेतकऱ्याच्या अनुभवजन्य ज्ञानामुळे शेती व्यवसायाला फार मोठा फायदा होतो. शेतीतील कामे नांगरणी, पेरणी, निंदनी, काढणी, कापणी आणि मळणी अशा प्रकारची सर्व कामे अल्पभूधाक शेतकरी आपल्या शेतीतील कामे करतात. शेती व्यवसायात यंत्राचा वापर शेतकरी कमी प्रमाणात करतात. शेती मशागत स्वतःच करतात. याचाही अभ्यास केला जाणार आहे.

९) अल्पभूधारक शेतकरी आणि शासकीय योजनेचा अभ्यास करता येण्या जोग्या जागा आहेत. अल्पभूधारक शेतकरी शेतीलगत जोडधंदे करतात. गायी म्हशी पालन, कुकुट पालन, शेती मेंढी पालन, वराह पालन आणि दूग्ध व्यवसाय कशी वेगवेगळी जोड धंदे करतात. जोडधंद्यासाठी काही शासनाच्या योजना आहेत. अल्पभूधारक शेतकऱ्याने जोडधंद्यासाठी या योजनाचा फायदा घेतला आहे की, नाही याचा ही अभ्यास या ठिकाणी करण्यात येणार आहे.

१०) बीड जिल्ह्यात अल्पभूधारक शेतकरी म्हणजे ज्यांच्याकडे ५ एकर पेक्षा कमी जमीन आहे असे शेतकरी व शासकीय योजनेचा फायदा घेतला आहे किंवा नाही, घेतला असेल तर उत्पन्नात वाढ झाली का याचा ही अभ्यास करण्यात येणार आहे.

११) अल्पभूधारक शेतकऱ्यांनी शेतीलगत सुरू केलेल्या जोडधंद्यासाठी शासनाच्या एखाद्या योजनेचा फायदा घेतला आहे काय? याचा ही सविस्तर अभ्यास प्रस्तुत विषयासंदर्भात करण्यात येणार आहे.

१२) बीड जिल्ह्यातील अल्पभूधाकर शेतकरी शेती व्यवसाय करून इतर कोणता व्यवसाय करतात याचे ही संशोधन करून प्रस्तुत विष्याची मांडणी करण्यात येणार आहे.

१३) गेली ६० वर्षे आर्थिक कार्यक्रमात शेती क्षेत्राला गौण स्थान प्राप्त झाले. सरकारच्या योजना शेतीला प्रोत्साहन देणाऱ्या नसून उद्योगांना महत्त्व देणाऱ्या असल्याने देशात सर्व क्षेत्रांना समान महत्त्व जोपर्यंत दिले जात नाही, तोपर्यंत शेतीक्षेत्र व शेतकरी मागासलेलाच राहील. शेतकऱ्याचे मागालेपण नाहीसे करण्यासाठी शासनाच्या विविध योजनेचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

१४) अल्पभूधारक शेतकरी आणि शासकीय योजना हा प्रश्न आर्थिक नीतीतूनच हाताळण्याची गरज नाही. परंतू आज कोणत्याही शेतकऱ्यांची संघटना किंवा चळवळ या दृष्टिकोनातून शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे बघण्याचा प्रयत्न करत नाही. त्यांचा अभ्यास विविध प्रश्नांच्या दृष्टिने करणे आवश्यक आहे.

१५) अल्पभूधारक शेतकऱ्यांचे प्रश्न मलमपट्टी वापरूनच सोडविण्याचे प्रयत्न होत आहेत. वरवर बघून हा प्रश्न सुटणार नाही. हे अनेकांना एकतर समजत नाही, अथवा समजत असले तरी ते उपाय त्यांना आडचणीत टाकणारे आहे असे वाटते. म्हणून या विषयाच्या अभ्यासाचे महत्त्व आहे.

१६) आज अल्पभूधारक शेतकऱ्यांना खऱ्या प्रश्नाची जाणीव करून देण्याठी आश्यकता आहे. अनेक विचारवंतांना या प्रबंधातील विचार शेतकयांचा प्रश्न सोडविण्याचा मार्ग दाखवू शकेल असे वाटते. ते जरी प्रश्न सोडवू शकले नसले, तरी शेतकऱ्यांच्या एकजुटीसाठी या विचारांचा उपयोक करून त्यांच्यात जागृती निर्माण करण्यासाठी या अभ्याचे महत्त्व आज वाढत चालले आहे.

१७) तरूण सशिक्षित अल्पभूधारक शेतकरी या विचारांना सहज समज शकतो. क्ष्यांना त्यातून नवीन जाणीव होऊ शकेल व आपले नेते इतकी वर्षे आपली दिशाभूल करत होते. या निर्णयाप्रत ते येऊ शकतील या दृष्टकोनातून अभ्यासाचे महत्त्व आहे.

१८) शासकीय पातळीवर शेतकऱ्यांच्या संघटनेच्या दबावामुळे काही सकारत्मक निर्णय घेण्यासाठी दडपण येऊ शकते. सरकारचे शेतकऱ्यांच्या बाबतीत असलेले इतक्या वर्षाचे धोरण कसे चुकीचे होते किंवा आहे. हे तरूण अल्पभूधाकर शेतकऱ्यांना योग्यरित्या समजू शकेल म्हणूनच अल्पभूधारक शेतकरी व शासकीय योजना या विषयी महत्तवपूर्ण अभ्यास करण्यात येत आहे.

१९) अल्पभूधारकाचा शेती व्यवसाय हाच मुळात अत्यंत महत्तवपूर्ण असा घटक आहे की, जो शती व्यवसायात प्राधान्यक्रमाने नंबर एकवर आहे. अल्पभूधाक शेतकऱ्याचे महत्त्व दुहेरी स्वरूपाचे आहे. एक प्रत्यक्षपणे कच्चामाल पुरविणे आणि स्वतःची उत्पादकता वाढवणे. यामुळे अल्पभूधारक शेतकऱ्यांना शेती व्यवसायात महत्त्वपूर्ण स्थान आहे.

२०) प्रामुख्याने अल्पभूधारक शेतकरी हे असंघटित आहेत. त्यांना शासनाच्या विविध योजना घेण्यासाठी किंवा राबविण्यासाठी कोणत्या समस्या आहेत याचा अभ्यास करणे. त्यांच्या समस्याच्या निराकरणासाठी कोणत्या स्वरूपाचे प्रयत्न व्हावेत याचा अभ्यास प्रस्तुत अभ्यासात महत्त्वाचा वाटतो म्हणून या अभ्यासाचे महत्त्व व्यापक आहे.

N.S.S.R'S
VASANTDADA PATIL COLLEGE, PATODA
THEORY TIME-TABLE FOR THE DEPARTMENT OF BOTANY



सारांश :

तीन - चार वर्षापासून दुष्काळाच्या छायेत असणाऱ्या बीड जिल्ह्यात यावर्षी जलयुक्त शिवार अभियानामुळे काही अंशी फायदा झाला. जिल्ह्यात १४०३ गावपैकी ३७१ गावांची निवड करण्यात आली. बीड जिल्ह्यात चार हजार कामे करण्यात आली आहेत. शासनाचा पुढाकार व लोकसहभागातून बीड जिल्ह्यात ४० प्रकल्पातील गाळ काढण्यात आला आहे. बीड जिल्ह्यात ४० प्रकल्पातील गाळ काढण्यात आला आहे. बीड जिल्ह्यातील ५५ गावांना जलयुक्तची कामे पूर्ण झाली आहेत.

महाराष्ट्रात मराठवाडा आणि मराठवाड्यात बीड जिल्ह्यासह इतर सर्वच जिल्ह्यातील शेती व्यवसाय हा निसर्गावर अवलंबुन आहे. निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतकऱ्याचे खूप मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. कधी ओला दुष्काळ तर कधी कोरडा दुष्काळ शेतकऱ्याच्या नशीबी येत आहे. तीन-चार वर्षापासून सतत अवकाळी पाऊस आणि गारपिठे मुळे जिल्ह्यातील शेतकरी त्रस्त झाला आहे. शासनाकडून मदतीची घोषणा वेळेवर होते. परंतु मदत वेळेवर मिळत नाही. जी मिळते ती खूपच अल्पशा प्रमाणात मिळते. शेतकऱ्यास पेरणीपासून ते घरात धान्य येईपर्यंत अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. अल्पभूधारक आणि अत्यल्पभूधारक शेतकऱ्याच्या जन्म कार्य आणि मृत्यू शेती समस्या सोडविण्यात होतो. शेतकरी कर्जात जन्माते, वाढतो आणि मृत्यू पावतो. अशी दशा अल्पभूधारक शेतकऱ्याची दिसून येते.

## संदर्भ सूची :-


१) हंगे आबासाहेब - बीड जिल्ह्यातील ऊसतोड कामगारांचा आर्थिक परिस्थितीचा अभ्यास - २००५.

२) आघाव दत्तात्रय - विकास योजने अंतर्गत पंचायत समिती मधील राजकारणाचा चिकित्सक अभ्यास - विशेष संदर्भ पाटोदा पंचायत समिती, जिल्हा बीड - मार्च २००७.

३) घोडके यादव - सफेपूर गावातील अल्पभूधारक शेतकऱ्याचा सामाजिक आणि आर्थिक स्थितीचा समाजशास्त्रीय अभ्यास - ऑक्टोबर २००८.

४) घोडके यादव - बीड जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यावरील शासकीय योजनेच्या प्रभावाचा समाजशास्त्रीय अभ्यास - जानेवारी २०१६.

५) बीड तालुक्यातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांचा समाजशास्त्रीय अभ्यास  जानेवारी २०२०.




Lecturer in.......
V.P.College, Patoda, Dist.Beed